# औषधे वापरण्याच्या पध्दती

## निंब तेल

*खरुज :-* अंघोळ करताना फडक्याने अंग चांगले घासावे नंतर संपूर्ण शरीराला निंब तेल चोलावे. असे २/३ दिवस करावे.

दाद *(गजकरण)* :- दाद झालेल्या भागाला अंघोळी नंतर निंबतेल लावून चोळवे.

*डोक्यातील उवा :-* डोक्यातील कातडी व केसाला निंब तेल रात्री लावणे. सकाळी केस धुणे. ७ दिवसा नंतर परत तसेच करणे.

*डोक्यातील भुसा (कोंडा, डँड्रफ) :-* डोक्यावरील कातडीला तेल लावणे. अर्ध्या तासा नंतर अंघोळ करणे पंधरा दिवस सतत करणे.

*मूळव्याध :-*शौच झाल्यानंतर गुदद्वार स्वच्छ धुणे व नंतर त्या जागेवर तेल लावणे.

*व्रण / जखम :-* जखम पाण्याने धुणे, कापूस तेलाने भिजवुन, लावून पट्टी बांधणे.

*अंग दुःखणे, सांधे सूजणे व सांधे दुःखी:-* जेथे जरूर आहे, तेथे दररोज मालीश करणे.

*त्वचारोग, सोरयासिस* :- अंघाळी नंतर निंबतेल लावून चोळते.

*पायाला भेगा पडणे*:- रात्री पाय साबणाच्या गरम पाण्यात १५ मिनीट बुडवून ठेवावे. नंतर पाय स्वच्छ धुवून निंब तेल चोळावे.

*गुरांना*:- लागणाऱ्या उवा व जखमेसाठी निंब तेल उपयुक्त आहे.

## आघाडा क्षार (पॅक बाटलीत ठेवणे)

*लघवी अडकणे :-(तिडीक लागणे)* एक चिमूटभर क्षार एक कप गरम पाण्यातून घेणे. दिवसातून दोनदा घेणे असे ३ दिवस करावे.

*कफाचा खोकला, टॉन्सिल्स* :- रात्री झोपतांना एक चिमूटभर क्षार एक कप गरम पाण्यातून घेणे, ३ रात्र.

*किडलेला दात* :- एका कापसाच्या बोळ्यावर क्षार ठेऊन दातात भरणे.

*कानात मळ आल्याने दुःखणे*:- चिमूटभर क्षार थोडसं तेलात उकळवून, तेल गाळावे व काही थेंब कानात टाकावे.

विंचू चावणे:- एक चिमूटभर क्षार दंशावर लावणे.